गृह विभाग

सचिवालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक १३ ऑक्टोबर १९६६

अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८

क्रमांक पीओए ११५८/८३५३६-यावोस अपराधी परिवीक्षा अधिनियम १९५८ (१९५८ चा २०) याच्या कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि केंद्र सरकारच्या मान्यतेने महाराष्ट्र शासन याद्वारे, पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम १७ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहत-

भाग एक

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव- या अधिनियमांना." महाराष्ट्र अपराधी परिवीक्षा नियम, १९६६" असे म्हणावे.

२. व्याख्या-या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर.-

(क) अधिनियम" याचा अर्थ, अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०) असा आहे,

(ख) " मुख्य नियंत्रक प्राधिकारी" याचा अर्थ, नियम ४ अन्वये नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे :

(ग) " मुख्य परिवीक्षा अधीक्षक" याचा अर्थ, समाजकल्याण उप संचालक (सुधार प्रशासन), महाराष्ट्र राज्य, असा आहे:

(घ) "संचालक" याचा अर्थ समाजकल्याण संचालक, महाराष्ट्र राज्य, असा आहे

(ङ) " जिल्हा परिवीक्षा अधिकारी" याचा अर्थ, नियम ३च्या पोट-नियम (२) अन्वये जिल्हा परिवीक्षा अधिकारी म्हणून पनिर्देशित केलेला अधिकारी, असा आहे;

(च) " नमुना" याचा अर्थ या निपनांसोबत जोडलेला नमुना, असा आहे:

(छ) " अंशकालिक परिवीक्षा अधिकारी" याचा अर्थ, राज्य शासनाने, अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मान्यता दिलेला किवा ज्याला वेतनाच्या स्वरूपात नव्हे तर, फीच्या किंवा मानधनाच्या स्वरूपात पारिश्रमिक दिले जाते किंवा जो मानधनाशिवाय काम करतो असा, एखाद्या संस्थेने, त्या अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये उपलब्ध केलेला, वेतनी परिवीक्षा अधिकाऱ्याव्यतिरिक्त, एखादा परिवीक्षा अधिकारी, असा आहे.

(ज) " परिवीक्षाधीन अपराधी व्यक्ती" याचा अर्थ, जिच्या बाबतीत पर्यवेक्षण आदेश अंमलात असेल अशी कोणतीही अपराधी व्यक्ती, असा आहे

(झ) "परिवीक्षा जिल्हा" याचा अर्थ, अधिनियमान्वये परिवीक्षा कार्य संघटित करण्यासाठी राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल असा एखादा जिल्हा किया एखादे मोठे अथवा लहान क्षेत्र, असा आहे;

(ञ) " परिवीक्षा गृह" याचा अर्थ, नियम ३३ मध्ये नमूद केलेली संस्था किंवा इतर परिवास्तू असा आहे;

(ट) "परिवीक्षा अधीक्षक" याचा अर्थ, मुख्य परिवीक्षा अधीक्षकाला सहाय्य करण्यासाठी राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असा आहे,

(ठ) " वेतनी परिवीक्षा अधिकारी" याचा अर्थ, राज्य शासनाने अधिनियमाच्य कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये नियुक्त केलेला अथवा मान्यता दिलेला किंवा अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये, संस्थेकडून पुरविण्यात आलेला व ज्याला फीच्या किंवा मानधनाच्या स्वरूपात नव्हे तर वेतनाच्या स्वरूपात पारिश्रमिक दिले जाते असा पूर्ण वेळ परिवीक्षा अधिकारी असा आहे,

(ड) "संस्था" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये आणि नियम २४ च्या पोट-नियम (३) अन्वये राज्य शासनाने मान्यता दिलेली एखादी संस्था, असा आहे.

(ढ) "विशेष परिवीक्षा अधिकारी" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये न्यायालयाने नामनिर्देशित केलेला परिवीक्षा अधिकारी, असा आहे

(ण) "पर्यवेक्षण आदेश" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (३) अन्वये दिलेला आदेश, असा आहे.

## भाग दोन

## परिवीक्षा अधिकाऱ्यांचे विभागीय नियंत्रण

३. परिवीक्षा अधिकारी व त्याचे नियंत्रण- (१) राज्य शासनास अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी प्रत्येक परिवीक्षा जिल्ह्याकरिता त्यास योग्य वाटतील इतक्या व्यक्तीची परिवीक्षा अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

(२) प्रत्येक परिवीक्षा जिल्ह्यातील सर्व परिवीक्षा अधिकारी (मग ते राज्य शासनाने नियुक्त केलेले किवा मान्यता दिलेले असोत) याबाबतीत राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या आणि जिल्हा परिवीक्षा अधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेल्या एका परिवीक्षा अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली असतील.

(३) राज्यातील असे सर्व परिवीक्षा अधिकारी, मुख्य परिवीक्षा अधीक्षकाच्या नियंत्रणाखाली असतील.

४. मुख्य नियंत्रक प्राधिकारी- या नियमांच्या प्रयोजनासाठी मुख्य नियंत्रक प्राधिकारी हा, संचालक असेल. तो सर्व परिवीक्षा अधिकारी आणि मुख्य परिवीक्षा अधीक्षक यांच्यावर प्रशासकीय नियंत्रण व देखरेख ठेवील आणि राज्य शासनाकडून त्याच्याकडे वेळोवेळी सोपविण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडील तसेच संचालक, -

(क) मान्यता प्राप्त संस्थांशी संबंध ठेवील.

(ख) परिवोक्षेशी संबंधित असलेल्या कार्याच्या प्रसारात आस्था हितसंबंध असणाऱ्या इतर संघटनांबरोबर आणि जनतेबरोबर संपर्क साधील.

(ग) राज्य शासन वेळोवेळी फर्मावील अशारितीने सांख्यिकी विवरणे आणि अशी नियतकालिक किंवा विशेष विवरणे किंवा इतर अहवाल, सादर करील:

(घ) मुख्य परिवीक्षा अधीक्षक आणि जिल्हा परिवीक्षा अधिकारी यांच्या कामाची आणि त्यांच्या कार्यालयांची दर वर्षी तपासणी करील आणि परिवीक्षा अधिकारी यांच्या कार्यालयांची आणि पर्यवेक्षण गृहांची राज्य शासनाकडून निश्चित करण्यात येईल. अशा कालावधीत एकदा तपासणी करील.

(इ) अधिनियमाखालील कामाबाबतचा आणि राज्यातील परिवीक्षा कार्याबाबतच्या वार्षिक अहवाल, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशारितीने राज्य शासनाला सादर करील.

५. मुख्य परिवीक्षा अधीक्षक- संचालक आयुक्तालय नियंत्रण आणि देखभाल यांच्या अधीन राहून मुख्य परिवीक्षा अधीक्षक, राज्यभरातील परिवीक्षा कामाची व्यवस्था पाहण्यास जबाबदार असेल आणि त्याची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या यांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल.

(क) जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्यांवर आणि इतर परिवीक्षा अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे, त्यांना मार्गदर्शन करणे आणि त्यांच्यावर देखरेख ठेवणे;

(ख) अपराध्यांचे पुनर्वसन करणाच्या प्रयोजनार्थ असणाऱ्या राज्यातील पश्चात जपणूक विषयक कामांना व इतर उपक्रमांना सहाय्य करणे आणि त्यांमध्ये वृद्धी करणे, आणि इतर संबंधित संघटना आणि जनता यांच्याशी संपर्क ठेवणे.

(ग) फर्माविण्यात येईल त्याप्रमाणे सांख्यिकी किंवा इतर विवरणे आणि अहवाल संचालकाकडे सादर करणे; आणि

(घ) संचालकाकडून किंवा राज्य शासनाकडून त्याच्यावर सोपविण्यात येतील अशी इतर कार्य पार पाडणे.

६. परिवीक्षा अधीक्षक- परिवीक्षा अधिक्षक, मुख्य परिवीक्षा अधीक्षकाचे नियंत्रण आणि पर्यवेक्षण यांच्या अधीन राहून, मुख्य परिवीक्षा अधीक्षकाकडून त्याच्यावर सोपविण्यात येतील अशी कार्य पार पाडील.

७. जिल्हा परिवीक्षा अधिकारी- (१) जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याचे मुख्यालय हे त्या जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी किंवा संचालकाकडून ठरविण्यात येईल अशा अन्य ठिकाणी असेल. जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याची अधिकारिता ज्या परिवीक्षा जिल्ह्यात त्याची पदस्थापना केली असेल त्या संपूर्ण परिवीक्षा जिल्ह्यात असेल.

(२) तो,-

(क) त्याच्या अधिकारितेखालील संपूर्ण क्षेत्रातील परिवीक्षा कामासाठी जबाबदार असेल :

(ख) जिल्ह्यातील परिवीक्षा अधीकाऱ्यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे, त्यांना मार्गदर्शन करणे आणि त्यांच्यावर देखरेख ठेवणे;

ग) तो, जिल्ह्यातील परिवीक्षा कामाशी संबंधित सर्व खर्चाच्या बावतीत, आहरण व वितरण अधिकारी असेल;

(घ) त्याच्या अधिकारितेतील सर्व परिवीक्षाधीन अपराध्यांची वर्तणूक व प्रगतीविषयक सहामाही अहवाल आणि अधिनियमाच्या कलम ९ अन्वये हाताळण्यात येणाऱ्या प्रकरणांचा अहवाल, मुख्य परिवीक्षा अधिकाऱ्याला सादर करणे;

(ड) राज्य शासन, संचालक, मुख्य परिवीक्षा अधीक्षक, जिल्हा दंडाधिकारी किंवा न्यायालय फर्मावील असे इतर अहवाल राज्य शासनाला, संचालकाला, मुख्य परिवीक्षा अधीक्षकाला, जिल्हा दंडाधिकाऱ्याला आणि न्यायालयाला सादर करणे.

(च) मुख्य परिवीक्षा अधीक्षकाकडून किंवा संचालकाकडून त्याला नेमून देण्यात येतील अशी अन्य कार्य पार पाडणे.

८. रजा.- (१) (क) जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याची नैमितिक रजा, मुख्या परिवीक्षा अधिकाऱ्याकडून मंजूर करण्यात येईल.

(ख) कोणताही परिवीक्षा अधिकारी आणि जिल्ह्यातील त्याच्या कार्यालयात राज्य शासनाने नेमलेला इतर कर्मचारीवर्ग यांची नैमितिक रजा, जिल्हा परिवीक्षा आधिकाऱ्याकडून मंजूर करण्यात येईल.

(२) जिल्हा परिवीक्षा अधिकारी, परिवीक्षा अधिकारी आणि इतर कर्मचारीवर्ग यांच्या इतर सर्व रजा संचालकाकडून मंजूर करण्यात येतील.

(३) परिवीक्षा अधिकाऱ्याने, रजा मंजूर करण्याचे अधिकार प्रदान केलेल्या प्राधिकाऱ्याकडे अनुपस्थितीच्या रजेसाठी आगाऊ अर्ज केला पाहिजे.

(४) परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसंबंधीच्या अधिनियमाच्या तरतुदीच्या अधिनतेने परिवीक्षा अधिकाऱ्याची रजा मंजूर करणारा किंवा त्याची बदली करणारा प्राधिकारी. (क) पर्यायी व्यवस्था करण्यासाठी किंवा परिवीक्षा अधिकाऱ्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक ते उपाय योजील, आणि (ख) जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याला आणि जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याला त्याबाबत माहिती देईल.

## भाग तीन

## परिवीक्षा अधिकाऱ्याच्या नियुक्तीसाठी अर्हता व सेवेच्या शर्ती

९. परिवीक्षा अधिकाऱ्याचे सर्वसाधारण गुणविशेष परिवीक्षा अधिकाऱ्यांची नियुक्ती करताना, परिवीक्षा अधिकाऱ्याच्या पुढील सर्वसाधारण गुणविशेषांकडे योग्य ते लक्ष देण्यात येईल म्हणजे.-

(क) त्याने, पुरेशी शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली असावी

(ख) त्याच्या पर्यवेक्षणाखाली असलेल्या व्यक्तींवर, दोन अत्यावश्यक बाबतीत, म्हणजे.-

(एक) परिवीक्षा कालावधीत कायद्यानुरूप पुष्टी देणे, आणि

(दोन) ते पुन्हा गुन्हेगारीकडे वळणार नाहीत अशारितीने त्यांच्या चारीत्र्यात आणि सामाजिक वागणूक विषयक वृत्तीत सुधारणा करणे याबाबतीत त्यांच्यावर प्रभाव पाडण्यायोग्य सच्छील चारित्र्य व प्रभावी व्यक्तीमत्व असावे. (ग) तो, वयाने सज्ञान व अनुभवी असावा (एखाद्या परिवीक्षा अपराध्याचा स्वतंत्र प्रभार असण्यासाठी परिवीक्षा अधिकाऱ्याचे वय ३० वर्षापेक्षा कमी नसावे); आणि

(घ) परिवीक्षा कामाकडे त्याचा कल असावा, आस्था असावी व ओढ असावी.

१०. वेतनी परिवीक्षा अधिकाऱ्यांची अर्हता.-

(१) वेतनो परिवीक्षा अधिकारी.-

(क) पदवीधर असावा, आणि

(ख) पहिल्या नियुक्तीच्या वेळी (प्रशिक्षणाचा कालावधी वगळता) त्याचे वय २५ वर्षापेक्षा कमी व ४० वर्षापेक्षा अधिक नसावे.

(२) राज्य शासनाने नियुक्त केलेल्या वेतनी परिवीक्षा अधिकाऱ्याने, तत्सम दर्जाच्या पदांसाठी राज्य शासनाने विहित केलेली इतर अर्हता धारण केलेली असावी व विहित केलेल्या दर्जाचे जवाबदारीचे पद भूषविलेले असावे.

(३) परिवीक्षाधीन अपराध्याचे पर्यवेक्षण सोपविण्यात येण्यापूर्वी, प्रत्येक वेतनी परिवीक्षा अधिकाऱ्याने पुरेसे प्रशिक्षण घेतलेले असावे.

११. अंशकालिक परिवीक्षा अधिकाऱ्यांची अर्हता, जिल्ह्यात नियुक्त केलेल्या अंशकालिक परिवीक्षा अधिकारी पदी असलेल्या व्यक्तीने,-

(क) एस. एस. सी/माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि तिचे वय ३० वषांपेक्षा कमी नसावे. नियुक्ती करताना पदवीधारकांना पसंती देण्यात यावी;

(ख) ती, त्या जिल्ह्यातील रहिवासी असावी :

(ग) परिवीक्षाधीन अपराध्यांचे पर्यवेक्षण करण्यासाठी पुरेसा वेळ देता येईल अशा स्थितीत ती असावी :

(घ) तिला समाज कल्याण कार्याचा किंवा शिकविण्याचा किंवा चारित्र्य घडविण्याच्या कामाचा पुरेसा प्रत्यक्ष अनुभव असावा.

(ङ) तिला अधिनियमाची आणि या नियमांची पूर्ण माहिती असावी.

१२. परिवीक्षा अधिकाऱ्यांची नियुक्ती व नोंदणी (१) राज्य शासनाने करावयाच्या परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसंबंधीची कार्यपद्धती ही, तत्सम दर्जाच्या आणि जबाबदारीच्या पदांवरील अधिकाऱ्यांच्या सेवाप्रवेशाशी संबंधित असलेल्या सर्वसाधरण नियमांनुसार असेल.

(२) संस्थेने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने किंवा मुख्य परिवीक्षा अधीक्षकाने अंशकालिक परिवीक्षा अधिकारी म्हणून मान्यता देण्यासाठी सादर केलेल्या, वेगवेगवेगळ्या ठिकाणच्या व्यक्तीची नावे राज्य शासनाला विचारात घेता येतील.

(३) (क) राज्य शासनाने मान्यता दिलेल्या सर्व परिवीक्षा अधिकाऱ्यांची नावे त्यांच्या पत्त्यांसह मुख्य परिवीक्षा अधीक्षकाकडे असलेल्या नोंदवहीत नोंदविण्यात येतील.

(ख) जिल्ह्यातील किंवा जिल्ह्याच्या विनिर्दिष्ट क्षेत्रातील सेवेसाठी किंवा जिल्ह्यातील विनिर्दिष्ट न्यायालयांकरिता नेमून दिलेले (एक) राज्य शासनाने नेमलेले परिवीक्षा अधिकारी, (दोन) संस्थांनी उपलब्ध करून दिलेले वेतनी परिवीक्षा अधिकारी अणि (तीन) अंश-कालिक परिवीक्षा अधिकारी, यांची नावे असलेली यादी, जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याकडून ठेवण्यात येईल आणि आवश्यकता भासेल तेव्हा ती न्यायालयांना उपलब्ध करून देण्यात येईल.

१३. विशेष परिवीक्षा अधिकारी

(१) एखाद्या विशिष्ट प्रकरणाची विशेष परिस्थिती लक्षात घेता ते नियम १२ च्या पोट-कलम (३) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या यादीमधील कोणताही परिवीक्षा अधिकारी उपलब्ध नसेल किंवा प्रकरण हाताळण्याच्या दृष्टीने, परिवीक्षा अधिकारी पुरेसा योग्य असल्याचे समजण्यात येत नसेल तेव्हा न्यायालयास त्या प्रकरणी, अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये एखाद्या विशेष परिवीक्षा अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल. न्यायालयास किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्यास अधिनियमाच्या कलम १३, पोट-कलम (२) अन्वये एखाद्या विशेष परिवीक्षा अधिकाऱ्याची देखील नियुक्ती करता येईल.

(२) एखादी व्यक्ती एखाद्या विशिष्ट प्रकरणात, अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये किंवा कलम १३ च्या पोट-कलम (२) अन्वये, परिवीक्षा अधिकारी म्हणून नियुक्त करण्यासाठी योग्य आहे किंवा कसे याबाबतचा निर्णय करताना, न्यायालयास किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्यास. (क) नियम ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेले सर्वसाधारण गुणविशेष आणि नियम १३ च्या तरतुदी. (ख) तिचे वय, दर्जा, चारित्र्य व नैपुण्य आणि अपराध्याबरोबरचे संबंध आणि (ग) हे नियम अनुसरण्यासाठी आणि परिवीक्षा अधिकाऱ्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी असलेली त्याची पात्रता या गोष्टी विचारात घेता येतील.

१४. परिवीक्षा अधिकाऱ्यांची निवड सावधगिरी, (१) सर्वसाधारणपणे, परिवीक्षाधीन

असलेल्या अपराधी महिलेस, पुरुष परिवीक्षा अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली किंवा नियंत्रणाखाली ठेवण्यात येऊ नये.

(२) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्ती आणि परिवीक्षा अधिकारी यांचे धर्ममते विचारात घेण्यात यावीत.

(३) एखादया विशिष्ट प्रकरणात पर्यवेक्षणासाठी परिवीक्षा अधिकाऱ्याची निवड करताना. न्यायालयास, आवश्यक असेल तेथे, जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करता येईल.

१५. सेवेच्या अटी व शर्ती. (१) (क) या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून राज्य शासनाने नियुक्त केलल्या परिवीक्षा अधिकाऱ्यांना लागू असलेल्या सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती ह्या, तत्सम दर्जा व जबाबदारी असलेल्या राज्य शासनाच्या इतर अधिकाऱ्यांसाठी ज्या अटी व शर्ती विहित केलेल्या असतील त्याप्रमाणे असतील.

(ख) संस्थेने नियुक्त केलेल्या वेतनी परिवीक्षा अधिकाऱ्यांना लागू असलेले वेतन, भत्ते व सेवेच्या इतर अटी व शर्ती हया, या नियमांनुसार, आणि नियम २४ च्या पोट-नियम (३), खंड (ख) अन्वये संचालकाने किंवा राज्य शासनाने दिलेल्या 'अनुदेशानुसार संस्थेकडून विहित करण्यात येतील.

(ग) अंश-कालिक परिवीक्षा अधिकाऱ्यास, (एक) त्याने पार पाडणे आवश्यक असलेल्या कर्तव्याचे स्वरूप आणि व्याप्ती लक्षात घेऊन निश्चित केलेले पारिश्रमिक देण्यात येईल. (दोन) मानधन देण्यात येईल; किंवा त्यास, कोणतेही पारिश्रमिक न घेता काम करता येईल.

(घ) विशेष परिवीक्षा अधिकाऱ्यास अंशकालिक परिवीक्षा अधिकाऱ्यांसाठी विहित केलेल्या दरानेच परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीच्या पर्यवेक्षणासाठी पारिश्रमिक किंवा भत्ते देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले असतील तर, त्याला तसे पारिश्रमिक किंवा भत्ते देण्यात येतील.

(२) (क) प्रत्येक परिवीक्षा अधिकाऱ्यास नमुना-एक मध्ये एक ओळखपत्र पुरविण्यात येईल, आणि त्याला निलंबित केल्यावर किंवा त्याची नियुक्ती समाप्त झाल्यावर ते ओळखपत्र, मुख्य परिवीक्षा अधिकाऱ्याला परत करण्यात येईल.

(ख) परिवीक्षा अधिकारी कोणताही गणवेष किंवा बिल्ला परिधान करणार नाहीत.

(३) एखादा परिवीक्षा अधिकारी, जर त्याच्या पदाचा राजीनामा देण्याची त्याची इच्छा असेल तर, किमान तीन महिन्यांची लेखी सूचना देईल. जर एखादा अंशकालिक परिवीक्षा अधिकारी, आजारपणामुळे किंवा इतर कारणामुळे आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल तर, तो लगेच त्याबाबतची वस्तुस्थिती जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याला कळवील.

## भाग चार

## परिवीक्षा अधिकारी कर्तव्ये व जबाबदाऱ्या

१६. विभागीय जबाबदारी- (१) प्रत्येक परिवीक्षा अधिकारी मुख्य परिवीक्षा अधीक्षकाच्या आणि मुख्य नियंत्रक प्राधिका-याच्या निर्देशांचे पालन करील.

(२) प्रत्येक परिवीक्षा अधिकारी, एखादी परिवीक्षाधीन अपराधी व्यक्ती त्याच्या पर्यवेक्षणाखाली ठेवल्यानंतर, लगेच त्याबाबतची वस्तुस्थिती आणि मुख्य परिवीक्षा अधीक्षकाकडून निर्देश देण्यात येईल अशा इतर वस्तुस्थितीसह असा तपशील जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याला कळवील.

(३) प्रत्येक परिवीक्षा अधिकारी-

(क) त्याच्या पर्यवेक्षणाखाली ठेवलेल्या प्रत्येक परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीबाबतच्या प्रगतीचा मासिक अहवाल नमुना-दोन मध्ये आणि न्यायालयास किंवा मुख्य परिवीक्षा अधीक्षकास सादर केलेल्या शिक्षापूर्व अहवालाच्या आणि इतर अहवालांच्या प्रती, जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याला सादर करील आणि

(ख) आवश्यक असतील असे नियतकालिक अहवाल आणि आकडेवारी मुख्य परिवीक्षा अधीक्षकास आणि जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्यास सादर करील.

१७. शिक्षापूर्व अहवाल. (१) अधिनियमाच्या कलम १४ (क) च्या प्रयोजनार्थ, परिवीक्षा अधिकारी, अपराधी व्यक्तीचे चारित्र्य आणि पुर्वेतिहास, त्याची सामाजिक आणि सभोवतालची स्थिती. तिच्या कुटुंबाची आर्थिक व इतर परिस्थिती, ज्या परिस्थितीत अभिकथित अपराध केलेला असेल ती परिस्थिती आणि ज्याबावत चौकशी करण्याचा न्यायालय त्याला निर्देश देईल अशी कोणतीही इतर वस्तुस्थिती यासंबंधी विचारपूर्वक चौकशी केल्यानंतर, अहवालात पूर्ण व प्रामाणिक अशी जास्तीत जास्त प्रस्तुत वस्तुस्थिती निदर्शक माहिती, नमुना-तीन मध्ये उतरवून काढील.

(२) प्रकरणाच्या संक्षेपामध्ये- अपराधी व्यक्ती दोषी आढळल्यानंतर ते प्रकरण हाताळण्याची सर्वाधिक योग्य पद्धत निर्धारित करण्यासाठी न्यायालयाला मदत व्हावी याकरिता, त्या प्रकरणातील परिवीक्षा अधिकाऱ्याच्या मुल्यमापन अहवालासह वस्तुनिष्ठ वस्तुस्थिती कथन केलेली असेल.

(३) हा अहवाल "गोपनीय" समजण्यात येईल, आणि तो. न्यायालयाकडून विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा दिनांकास न्यायालयाकडे सुपूर्द करण्यात येईल अहवाल न्यायालयाकडे पाठवायचा असेल किवा निवाडा करण्याच्या (न्यायनिर्णय देण्याच्या) दिनांकाच्या आधीच्या तारखेस सुपूर्द करावयाचा असेल तर,तो मोहोरबंद पाकिटात ठेवला पाहिजे.

१८. परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींचे पर्यवेक्षण (१) परिवीक्षा अधिकारी हा, परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचा एक मित्र आणि मार्गदर्शक म्हणून कार्य करील. या प्रयोजनासाठी तो, पर्यवेक्षण आदेशाच्या कोणत्याही तरतुदीच्या अधीन परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीला नियत कालांतराने, अधून मधून आपल्याला (स्वतःला) भेटण्यास आणि सतत आपल्या संपर्कात राहण्यास सांगेल.

(२) पहिल्या भेटीच्या वेळी परिवीक्षा अधिकारी.-

(क) पर्यवेक्षण आदेशातील शर्ती परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीला स्पष्ट करून सांगोल

(ख) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीने स्वतःचे वर्तन कसे ठेवावे यावावत तिला सल्ला देईलः आणि

(ग) ज्या दिवशी परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीने अधिकाऱ्यासमोर हजर राहावयाचे ते दिवस विनिर्दिष्ट करील आणि परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीला अनावश्यक त्रास होऊ नये आणि योग्य ती गुप्तता राखता यावी अशाप्रकारे, भेटीची हजर (राहाण्याची) वेळ, आणि ठिकाण विनिर्दिष्ट करील, आणि अशाप्रकारे हजर राहण्यात परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीकडून कोणतीही चूक झाल्यास त्याचा समाधानकारक खुलासा करण्यास ती जवाबदार राहील. असे त्या परिवीक्षाधीन व्यक्तीला कळवील.

(३) परिवीक्षा अधिकारी परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीने केलेली प्रगती पाहता यावी आणि त्याला कोणत्याही अडचणी आल्या असल्यास त्या अडचणी जाणून घेता याव्यात म्हणून त्या परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीची तिच्या घरी-दारी आणि योग्य वाटेल त्याबाबतीत तिच्या व्यवसायाच्या ठिकाणी भेट घेईल :

परंतु, शाळेत किंवा महाविद्यालयात जाणाऱ्या तरुण अपराध्यांच्या बाबतीत, परिवीक्षा अधिकारी त्या परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीची त्याच्या शैक्षणिक परिसंस्थेत भेट घेणार नाही. मात्र, त्यास परिक्षाधीन अपराधी व्यक्तीच्या हितास कोणत्याही रीतीने बाधा न पोहोचवता, तिची हजेरी, वर्तणूक आणि सुधारणा यासंबंधी त्या परिसंस्थेच्या शिक्षकाकडे किंवा पाठनिर्देशकाकडे किंवा संस्थाप्रमुखाकडे बारीक चौकशी करता येईल.

४) अधिकाऱ्याने द्यावयाच्या भेटीसह, भेटीची वारंवारता ही त्या परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीच्या वर्तनावर आणि जीवनशैलीवर/जीवनपद्धतीवर आणि ती करीत असलेल्या प्रगतीवर अवलंबून असावी. मात्र न्यायालयाने अन्यथा निर्देश दिलेले नसतील तर अशा भेटींची संख्या.-

(क) पहिल्या महिन्यात, आठवड्यातून किमान एकदा असावी

(ख) परिवीक्षा कालावधीच्या उर्वरित पूर्वार्धात पंधरवड्यातून किमान एखादा असावी, आणि

(ग) उर्वरित कालावधीत महिन्यातून किमान एखादा असावी.

(५) परिवीक्षा अधिकारी, (क) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीकडून पर्यवेक्षण आदेशाच्या शर्तीचे उल्लंघन होणार नाही किंवा ती आणखी कोणताही अपराध करणार नाही आणि ती कायद्याला धरून वागेल आणि (ख) तिची वागणूक, सामाजिक वर्तन, सवयी, चारित्र्य आणि नैतिकता सुधारेल व ती पुन्हा गुन्ह्याकडे वळणार नाही याची खात्री करण्यासाठी उदाहरण देऊन, सल्ला देऊन, मन वळवून आणि सहाय्य करून आणि आवश्यकता असेल तेथे ताकीद देऊन सतत प्रयत्न करील.

(६) परिवीक्षा अधिकारी परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीची वागणूक आणि जीवन पद्धती यांना अधिक चांगले वळण देण्यासाठी किंवा तिच्यावर बारीक लक्ष ठेवण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कार्यवाही देखील करील.

(७) तसेच, परिवीक्षा अधिकारी परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचा भावीकाळ सुधारण्यासाठी आवश्यकता भासल्यास आणि आवश्यक असेल तेव्हा त्या परिवीक्षाधीन अपराधी व्याक्तीला रुग्णालयात मनोविकृति चिकित्सालयात व्यवसायोपचार केंद्रात जाण्याचा सल्ला देईल आणि त्यासाठी तिला मदत करील.

१९. न्यायालयांच्या संबंधातील कर्तव्ये- (१) परिवीक्षा अधिकाऱ्यास, ज्या न्यायालयापुढे परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचे प्रकरण असेल/परिवीक्षाधीन अपराधी व्यक्ती ज्या न्यायालयाशी संबंध्द असेल त्या न्यायालयास, परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीच्या वागणुकीनुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे बंधपत्राच्या शर्तीमध्ये बदल करून त्या अधिक कडक किंवा शिथिल करण्यासाठी त्या न्यायालयाला विनंती करता येईल.

(२) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीमध्ये पुरेशी सुधारणा झाली आहे आणि तिचे आणखी पर्यवेक्षण करण्याची आवश्यकता नाही असे परिवीक्षा अधिकाऱ्याला वाटले तर, तो अधिनियमाच्या कलम ८ च्या पोट-कलम (३) अन्वये तिला बंधपत्रातून मुक्त करण्यासाठी मुख्य परिवीक्षा अधीक्षकाला तसे कळवून व जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून त्या न्यायालयात एक अर्ज करील.

(३) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीने बंधपत्राच्या कोणत्याही शर्तीचे अनुपालन केले नाही किंवा ती पर्यवेक्षण आदेशाचा हेतू पूर्ण करण्याची शक्यता नाही असे दर्शविणारे तिचे वर्तन असेल तर, परिवीक्षा अधिकारी आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करण्यासाठी जिल्हा परिवीक्षा अधिका-यामार्फत न्यायालयाला आणि जिल्हा दंडाधिकाऱ्याला ती वस्तुस्थिती कळवील.

(४) परिवीक्षा अधिकारी अधिनियमाच्या कलम ११ अन्वये अपील किंवा पुनरीक्षणासंबंधात जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याशी विचारविनिमय करील.

२०. मुख्य परिवीक्षा अधीक्षकाच्या संबंधातील जबाबदाऱ्या.-

परिवीक्षा अधिकारी,-

(१) एखाद्या परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीच्या पर्यवेक्षणासंबंधी, मुख्य परिवीक्षा अधिकारी किंवा त्याच्या वतीने काम करण्यासाठी त्याने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला एखादा जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी नसेल असा अन्य अधिकारी यांनी दिलेल्या कोणत्याही निर्देशांचे पालन करील;

(२) आवश्यक करण्यात येईल त्याप्रमाणे, परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींच्या प्रगतीसंबंधातील नमुना दोन मधील अहवाल मुख्य परिवीक्षा अधीक्षकाला सादर करील;

(३) (क) ज्यामध्ये पर्यवेक्षण-आदेश किंवा बंधपत्र यांतील शर्तीचे पालन करण्यात आलेले नाही अशा प्रकरणांबरोबरच. -

(एक) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचा बदललेला निवासी पत्ता :

(दोन) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीने नव्याने केलेला कोणताही अपराध;

(तीन) पर्यवेक्षण आदेशाच्या शर्तीचे गंभीर दखल घेण्याजोगे केलेले उल्लंघन;

(चार) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीने फरार होण्यासाठी आखलेली कोणतीही योजना;

या गोष्टींचा समावेश असेल अशी प्रकरणे.

(ख) एखाद्या व्यक्तीने परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीला एखादा गुन्हा करण्यास मदत करण्याचा किंवा तसे करण्यास अपप्रेरणा देण्याचा केलेला प्रयत्न किंवा अन्यथा, जेणेकरून परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीच्या वर्तनावर व तिच्यात होत असलेल्या सुधारणेवर प्रतिकूल परिणाम होईल अशाप्रकारे एखाद्या व्यक्तीकडून तिच्यावर पाडण्यात येणारा प्रभाव; आणि

(ग) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीच्या पुनर्वसनाच्या कामात अडथळा निर्माण करणारे कोणतेही घटक असल्यास, असे घटक अशा गोष्टीची,-

माहिती मुख्य परिवीक्षा अधीक्षकास कळवील.

२१- परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचे पुनर्वसन आणि अनुरक्षण- (१) परिवीक्षा अधिकारी, परिवीक्षाधीन अपराधी व्यक्ती पुन्हा गुन्हेगारीकडे वळू नये यासाठी परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींच्या सामाजिक पुनर्वसनाला सहाय्य करील. या प्रयोजनार्थ परिवीक्षा अधिकारी परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीस,

(क) प्रशिक्षण सुविधा,

(ख) नोकरीच्या संधी,

(ग) कोणतीही आवश्यक आर्थिक मदत, आणि

(घ) सर्वसामान्य व्यक्ती आणि बॉईज स्काऊट व गर्ल्स गाईड, युवक संख्या व सामाजिक प्रकल्प यांसारख्या लोकहितकारी संघटना मिळवून देण्यासाठी झटून प्रयत्न करील. (२) परिवीक्षा अधिकारी, सोडून देण्यात आलेल्या परिवीक्षाधीन व्यक्तींनी आपल्या पुनर्वसनाच्या दृष्टीने केलेल्या प्रगतीचा माग ठेवण्यासाठी मुख्य परिवीक्षा अधीक्षक विहित करील अशा कालावधीकरिता अशा परिवीक्षाधीन व्यक्तींशी सातत्याने संपर्क ठेवील आणि असा अनुवर्ती- अहवाल जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्यास व मुख्य परिवीक्षा अधीक्षकास सादर करील.

(३) परिवीक्षा अधिकारी, शक्य असेल तेव्हा, अनुरक्षण योजनांमध्ये व नवजीवन मंडळ (मुक्त केदी सहाय्य संस्था) यांसारख्या संघटना, जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संस्था, युवक क्लब यांमध्ये सहभागी होईल.

२२. परिवीक्षा अधिकाऱ्याची अन्य कर्तव्ये- परिवीक्षा अधिकारी, जिल्हा परिवीक्षा अधिका-याच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यदेखील हाती घेईल, ती अशीः-

(१) परिवीक्षा पद्धतीचे लोकांना ज्ञान करून देणे व त्यासाठी त्यांचा पाठिंबा मिळवणे.

(२) सामाजिक सुरक्षेसाठी लोकांचे सहाय्य व सहकार्य मिळवणे.

(३) नेमून देण्यात येईल अशा नियम ३३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही संस्थेचा किंवा अन्य परिवास्तूचा प्रभार घेणे.

(४) राज्य शासनाच्या संचालकाच्या आदेशाद्वारे नेमून देण्यात येतील अशी तत्सम स्वरूपाची अन्य कोणतीही कर्तव्ये.

२३. परिवीक्षा अधिकारी माहितीचा गौप्यभेद करणार नाही-परिवीक्षा अधिकारी, परिवीक्षाधीन व्यक्तीची तो करीत असलेली, चौकशी किंवा तो करीत असलेले परिवीक्षेचे काम यांच्याशी संबंधित माहिती ज्या प्राधिकाऱ्याला ती माहिती देणे आवश्यक आहे त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडे उघड करणार नाही; मात्र, परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीच्या हिताच्या दृष्टीने अशी माहिती उघड करणे आवश्यक असेल तर गोष्ट वेगळी.

## भाग पाच

## संस्थेला मान्यता देणे

२४. संस्थेला मान्यता देणे- (१) एखाद्या संस्थेने मुख्यत्वेकरून पुढीलपैकी कोणत्याही प्रकारच्या कामाला वाहून घेतले असेल तर ती, या अधिनियमाच्या कलम १३, पोट-कलम (१), खंड (ख) अन्वये मान्यता मिळण्यास पात्र ठरेल, ती कामे अशी-

(क) सामाजिक सुरक्षा व त्याचबरोबर अपराधी किंवा सुटका करण्यात आलेले कैदी यांची देखभाल करणे, त्यांचे अनुरक्षण करणे किंवा त्यांना सहाय्य करणे आणि सुटका करण्यात आलेल्या किंवा निराक्षित महिला किंवा मुले यांचे संरक्षण व त्यांना प्रशिक्षण देणे;

(ख) शिक्षण किंवा अन्य समाज कल्याणाची कामे; आणि

(ग) धार्मिक किंवा धर्मदाय कामे करणे व खंड (क) मध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यक्तींना सहाय्य करण्यात व त्यांचे पुनर्वसन करण्यात स्वारस्य असणे. (२) पोट-नियम (१) अन्वये पात्र असणारी व मान्यता मिळण्यासाठी इच्छुक असेल अशी कोणतीही संस्था, राज्य शासनाच्या संचालकामार्फत अर्ज करील या अर्जासोबत संस्थेचे प्रत्येक नियम, उप विधि, संस्थापन नियमावली (असल्यास), तिच्या सदस्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या यादीची एक प्रत आणि संस्थेचा दर्जा आणि सामाजिक किंवा सार्वजनिक सेवेचा पूर्वेतिहास दर्शविणारे विवरणपत्र जोडील.

(३) राज्य शासन, संस्थेचा दर्जा सामाजिक किंवा सार्वजनिक सेवेचा पूर्वेतिहास व संस्थेची सध्या असलेली परिस्थिती याविषयी त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यावर आणि संस्थेकडे तिची दायित्वे पार पाडण्याकरिता पुरेशा प्रमाणात आर्थिक साधनसंपत्ती आहे याविषयी स्वतःची खात्री पटल्यावर संस्था पुढील गोष्टींची हमी घेईल या शर्तीवर तिला मान्यता देईल-

(क) राज्य शासन किंवा न्यायालय मागणी करील तितके परिवीक्षा अधिकारी देण्यात येतील;

(ख) हे नियम व राज्य शासन व मुख्य नियंत्रण प्राधिकरण यांनी दिलेले कोणतेही निर्देश यांचे पालन करील आणि ते, परिवीक्षा अधिकाऱ्याकडून आणि नियम ३३ मध्ये निर्देशिलेली, तिच्या अखत्यारीतील कोणतीही संस्था किंवा अन्य वास्तू असल्यास त्यांच्या कर्मचारीवर्गाकडून अनुसरण्यात येत आहेत हे पाहिल; आणि

(ग) आवश्यक असेल त्या त्या वेळी तिची आर्थिक स्थिती दर्शविणारे विवरण पत्रतसेच कोणताही ताळेबंद व लेखापरीक्षित अहवाल असल्यास असा ताळेबंद व लेखापरीक्षित अहवाल राज्यशासनाला सादर करील.

(४) राज्य शासनाला, संस्थेस तीन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर पोट-नियम (१) खाली दिलेली संस्थेची मान्यता काढून घेता येईल. संचालकाच्या शिफारशीवरून, राज्य शासनाला तीन महिन्यांची नोटीस दिल्यावर मान्यताप्राप्त संस्थेला देखील राज्य शासनाकडून आपली मान्यता काढून घेता येईल.

२५. संस्थेला अर्थसहाय्य पुरविणे- (१) ज्या मान्यताप्राप्त संस्थेला परिवीक्षेसंबंधातील आपल्या कामांसाठी मदत म्हणून राज्य शासनाकडून अर्थ सहाय्य हवे असेल त्याबाबतीत ती संस्था मुख्य परिवीक्षा अधीक्षकांमार्फत संचालकाकडे अर्ज पाठवील व त्यासोबत पुढील गोष्टींच्या प्रती जोडील.

(क) परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या वेतन, भत्ते व सेवाशर्ती यासंबंधातील नियम आणि तिच्या अखत्यारीतील, नियम ३३ मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही संस्था किंवा अन्य जागा असल्यास, त्यांच्या व्यवस्थापना-संबंधातील नियम;

(ख) मागवण्यात येईल असा अन्य तपशील,

(२) राज्य शासनास, योग्य प्रकरणांमध्ये व संचालकांच्या शिफारशीवरून, एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेस असे अर्थसहाय्य त्याला योग्य वाटेल तितका काळ देता येईल.

(३) ज्या संस्थेला अर्थसहाय्य देण्यात आले असेल, ती, -

(एक) आपला वार्षिक अहवाल व लेखापरिक्षित लेखे तसेच, संचालक मागणी करू शकेल
असे अन्य कोणतेही अहवाल सादर करील.

(दोन) पर्यवेक्षणाची व कामाची मानके राखील / दर्जाराखील व तिच्या अखत्यारीत येणाऱ्या नियम ३३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही संस्था किंवा अन्य वास्तू असल्यास, संचालकाचे समाधान होईल अशा रीतीने, त्यांचे व्यवस्थापन करील.

(तीन) संबंधित अधिका-याकडून करण्यात येणाऱ्या निरीक्षणासाठी तपासणीसाठी सर्व सुविधा पुरवील.

२६. परिवीक्षा अधिकाऱ्यांचे नियंत्रण- (१) (क) संस्थेने नियुक्त केलेला एखादा परिवीक्षा अधिकारी या अधिनियमाद्वारे किंवा या नियमांद्वारे त्याच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यात किंवा मुख्य परिवीक्षा अधीक्षक किंवा मुख्य नियंत्रक प्राधिकारी किंवा राज्य शासन यांनी परिवीक्षा अधिकाऱ्याच्या कामाचे विनियमन व त्याचे वर्तन यांसाठी दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात कसूर करील तर, न्यायालय किंवा जिल्हादंडाधिकारी किंवा जिल्हा परिविक्षा अधिकारी ती वस्तुस्थिती संस्थेला कळविल: आणि त्यावर संस्था योग्यती कारवाई करील, आणि करण्यात आलेल्या कारवाईची जिल्हापरिवीक्षा अधिकाऱ्यास माहिती देईल.

(ख) संस्था अशा परिवीक्षा अधिकाऱ्याला त्याच्या पदावर राहण्यास अपात्र ठरवीत असेल अशा प्रकरणाच्या संबंधात त्याच्याविरूद्ध करण्यात आलेली प्रत्येक तक्रार विचारात घेईल आणि त्याला ज्या तक्रारीची चौकशी करणे आवश्यक आहे असे वाटेल अशा प्रत्येक तक्रारीची चौकशी करील, आणि आवश्यक असेल त्या त्याबाबतीत पुढील शिस्तभंगाची कारवाई करील आणि त्याबाबतची माहिती मुख्य परिवीक्षा अधीक्षकाला देईल.

(२) संस्थेने परिविक्षा अधिकाऱ्याकडे सोपविलेले काम, संचालक किंवा या संबंधात त्याच्या वतीने काम करण्यासाठी राज्य शासनाने अधिकार प्रदान केलेला कोणताही अधिकारी यांचें मार्गदर्शन, पर्यवेक्षण व नियंत्रण यांच्या अधीन असेल.

## भाग सहा
## न्यायालये व जिल्हादंडाधिकारी यांची कार्यपद्धती

२७. न्यायालयाची कार्यपद्धती.-

(१) न्यायालयाला, एखाद्या परिवीक्षा अधिकाऱ्यास, आरोपी व्यक्तीचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य ज्या परिस्थितीत अपराध करण्यात आला असेल ती परिस्थिती व इतर बाबी यांची शक्यतोवर नमुना चारमध्ये चौकशी करण्याचे आणि त्याचा अहवाल विहित दिनांकाला जो सामान्यतः न्यायनिर्णय देण्याचा संभाव्य दिनांक असे सादर करण्याचे निर्देश देता येतील. आरोपी हा दोषी असल्याचे निष्पन्न झाले तरच न्यायालय हा अहवाल विचारात घेईल. मात्र जर तो दोषी असल्याचे आढळून आले नाहीतर असा अहवाल संबंधित परिवीक्षा अधिकाऱ्यास भावी काळातील संदर्भासाठीचा एक अभिलेख म्हणून परत करण्यात येईल.

(२) न्यायालय परिवीक्षा अधिकाऱ्याला कोणतीही आणखी चौकशी करण्याचा आणि आवश्यक असेल त्या प्रकरणात पोलिसांच्या मदतीने, अपराध्याची वैद्यकीय किंवा मानसशास्त्रीय तपासणी करविण्याचा आणि अधिनियमाच्या कलमे ३,४,५,६ व ७ अन्वये करावयाची कारवाई न्यायालयाला ठरविता यावी यासाठी त्याबाबतची माहिती न्यायालयाला देण्याचा निदेश देऊ शकेल.

(३) न्यायालय चौकशी करण्यासाठी किंवा वैद्यकीय किंवा मानसशास्त्रीय अहवाल मिळवण्यासाठी परिवीक्षा अधिकाऱ्याला आवश्यक असेल त्या त्या त्यावेळी पोलीस संरक्षण पुरविण्याचा आदेश देऊ शकेल.

२८. नमुने. - पुढीलपैकी प्रत्येक नमुन्यांचा त्यासमोर दिलेल्या प्रयोजनांसाठी वापर करण्यात येईलः-

(क) नमुना पाच. -अधिनियमाच्या पोट-कलम (१) खालील चांगल्या वर्तनाबाबतचे बंधपत्र.

(ख) नमुना सहा. -अधिनियमाच्या कलम ४, पोट-कलम (३) खालील पर्यवेक्षण आदेश.

(ग) नमुना सात.-अधिनियमाच्या कलम ४. पोट-कलम (४) खाली परिवीक्षाधीन व्यक्तीने द्यावयाचे हमीपत्र.

२९. परिवीक्षा अधिकाऱ्याने अहवाल देणे- न्यायालयास, अधिनियमाच्या कलमे ८ व ९ च्या प्रयोजनांसाठी परिवीक्षा अधिकाऱ्यास त्याच्या देखरेखी खाली ठेवण्यात आलेल्या परिवीक्षाधीन व्यक्तीमधील सुधारणा, वर्तणूक, राहणी या संबंधातील अहवाल करारनिविष्ट दिनांकाला न्यायालयाला सादर करण्यास किंवा नियतकालिक अहवाल न्यायालयाला सादर करण्यास सांगता येईल.

३०. संस्थेने पुरविलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याची नियुक्ती करणाऱ्या न्यायालयाने पर्यवेक्षण आदेशाची प्रत त्या संस्थेला पाठवणे. - कलम ४ च्या पोट-कलम (३) अन्वये एखाद्या न्यायालयाने पर्यवेक्षण आदेश दिला असेल आणि संस्थेने पुरविलेल्या परिवीक्षा अधिकारी नियुक्त केला असेल तर, न्यायालय त्याची एक प्रत संस्थेला अग्रेषित करील.

३१. जिल्हा दंडाधिकाऱ्याची कार्ये- जिल्हा दंडाधिकारी किंवा त्याने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला उप विभागीय दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अन्य कोणाताही अधिकाऱ्यास, -

(१) त्याच्या अधिकारक्षेत्रात काम करीत असलेल्या कोणत्याही परिवीक्षा अधिकाऱ्याच्या कामाची व कार्यालयातील कोणत्याही अभिलेखाची पाहणी करता येईल;

(२) परिवीक्षा अधिकाऱ्यांचे पर्यवेक्षणासंबंधातील काम यथोचितरीत्या केले जावे यांसाठी त्यांना जे निदेश तातडीने देणे आवश्यक आहे असे त्याला वाटेल असे कोणतेही निदेश त्यांना देता येतील, आणि

(३) जिल्हा परिवीक्षा अधिकारी व मुख्य परिवीक्षा अधीक्षक यांना पूर्ववर्ती किंवा अन्य वस्तुस्थितीवरील त्याने काढलेले निष्कर्ष किंवा त्याचा अहवाल पाठवता येईल.

३२. जिल्हा परिवीक्षा समित्यांची कार्ये- जिल्हा दंडाधिकाऱ्यास, परिवीक्षा अधिकारी अधिनियम अन्वये करीत असलेल्या जिल्हामध्ये कामावर देखरेख करण्याकरिता परिवीक्षा समिती तयार करता येईल. ही समिती वेळोवेळी, अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थांचा आढावा घेईल आणि आवश्यक असल्यास अधिनियमाखालील कामाचा दर्जा सुधारण्यासाठी मुख्य परिवीक्षा अधीक्षकाला सूचना देईल.

जिल्हा परिवीक्षा समितीची रचना राज्य शासनाकडून करण्यात येईल.

## भाग सात

## परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींचे राहण्याचे ठिकाण

३३. परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींना प्रवेश देण्यासाठी संस्था किंवा इतर वास्तू- (१) राज्य शासन, त्याला ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीनतेने (यात व्यवस्थापन व निरीक्षण यांच्याशी संबंधित शर्तीचा समावेश असेल), पर्यवेक्षण आदेशाद्वारे ज्या परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीला कोणतेही परिवीक्षागृह संस्था किंवा इतर वास्तू यांमध्ये ठेवावयाचे असेल असे कोणतेही परिवीक्षागृह, संस्था किंवा वास्तू चालवील किंवा त्यास मान्यता देईल.

(२) असे कोणतेही परिवीक्षागृह, संस्था किंवा अन्य वास्तू यांची संचालक वेळोवेळी देईल अशा सूचनांनुसार चालविण्यात येईल तिची व्यवस्था ठेवण्यात येईल व तिची तपासणी करण्यात येईल.

३४. अशा संस्थेतील अथवा अन्य वास्तूतील परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचा निवास. -(१) परिविक्षाधीन अपराधी व्यक्तीचे निश्चित वसतीस्थान नसल्याच्या किंवा त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी त्याच्याकडे कोणतेही योग्य वसतीस्थान नसल्याच्या

किंवा त्याच्या राहत्या घरासभोवतालचा परिसर परिवीक्षेचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने योग्य नसल्याचे किंवा परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीस अशा परिवीक्षागृहात, संस्थेत किंवा जागेत ठेवल्यामुळे परिवीक्षेची उद्दिष्टे चांगल्या रीतीने पार पाडता येतील या कारणास्तव एखाद्या परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीस कोणत्याही परिवीक्षागृहात, संस्था किंवा नियम ३३ मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या अन्य जागेत ठेवणे आवश्यक व इष्ट आहे असे परिवीक्षा अधिकाऱ्याचे मत असल्यास. अशा परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीस अशा परिवीक्षागृहात, संस्थेत किंवा नियम ३३ मध्ये निर्देशित केलेल्या अन्य जागेत राहण्यास सांगण्यात येईल.

(२) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीस, ज्या न्यायालयाद्वारे पर्यवेक्षण आदेश देण्यात आला असेल त्या न्यायालयाच्या आदेशाच्या पुरःसरणार्थ किंवा परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीबरोबर करण्यात आलेल्या बंधपत्राअनुसार, देखील अशा कोणत्याही संस्थेत किंवा जागेत राहण्यास फर्मावता येईल.

३५. निवासस्थानातील बदल.-(१) पर्यवेक्षण आदेशाच्या शर्तींना अनुसरून देखरेखीखाली असणारी एखादी-परिवीक्षाधीन अपराधी व्यक्ती जर तिच्या निवासाचे ठिकाण बदलणार असेल किंवा ते बदलण्याचे तिने ठरविले असेल आणि असे निवासाचे ठिकाण हे परिवीक्षा अधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर असेल तर तिला.-

(क) जर तिच्या राहण्याचा अवधी पंधरवड्यापेक्षा अधिक नसेल तर, परिवीक्षा अधिकाऱ्याची :

(ख) जर असा अवधी पंधरवड्यापेक्षा अधिक असेल मात्र तीन महिन्यांहून अधिक नसेल तर, परिवीक्षा अधिका-याच्या शिफारशीवरुन, जिल्हादंडाधिकाऱ्याची; किंवा

(ग) जर असा अवधी तीन महिन्यांहून अधिक असेल तर परिवीक्षा अधिकाऱ्यामार्फत करण्यात आलेल्या अर्जावरुन, न्यायालयाची.

- परवानगी घ्यावी लागेल.

(२) निवासाच्या ठिकाणातील अशा कोणत्याही बदलाची माहिती संबंधित न्यायालयाला द्यावी लागेल.

(३) पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे, परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचा राहण्याचा अवधी पंधरवड्याहून जास्त होत असल्यास परिवीक्षाधीन अपराधी व्यक्ती, विनिर्दिष्ट दिनांकास किंवा त्यापूर्वी, बदललेले निवासाचे ठिकाण ज्या परिवीक्षा अधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्रात येत असेल त्या अधिकाऱ्याला त्याबाबतची माहिती देईल.

(४) बदललेल्या निवासाच्या ठिकाणचा परिवीक्षा अधिकारी, मूळ परिवीक्षा अधिकाऱ्याला परिविक्षाधीन अपराधी व्यक्ती आपल्याकडे आल्याबाबतचा अहवाल पाठवील आणि अशा अहवालाच्या प्रती व मुख्य परिवीक्षा अधीक्षक फर्मावील अशा अन्य अहवालांच्या प्रती संबंधित जिल्हादंडाधिकाऱ्याला किंवा जिल्हादंडाधिकाऱ्यांना आणि संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्यांना पाठवील.

(५) पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला मुक्कामाचा अवधी एक महिन्यापेक्षा अधिक होईल तर, निवासाचे बदललेले ठिकाण ज्याच्या अधिकारक्षेत्रात येत असेल असा जिल्हादंडाधिकारी किंवा न्यायालय अधिनियमाच्या कलम १३, पोट-कलम (२) अन्वये नवीन परिवीक्षा अधिकाऱ्याची नियुक्ती करू शकेल. परिवीक्षा अधिका-यांच्या अशाप्रकारे करण्यात आलेल्या नियुक्त्यांची माहिती मुख्य परिवीक्षा अधिक्षकास देण्यात येईल.

## भाग आठ

## अभिलेख

३६. परिवीक्षा अधिकाऱ्यांनी ठेवावयाचा अभिलेख.-

(१) परिवीक्षा अधिकारी पुढील अभिलेख ठेवील जसे.-

(क) प्राथमिक चौकशा, न्यायालयातील उपस्थिती, परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीबरोबरच्या भेटी, संस्थांशी असलेले संबंध व नियम ३३ मध्ये निर्देशिलेल्या संस्थांना व वास्तुना देण्यात आलेल्या भेटी यांसह दैनंदिन कामकाज दर्शविणारी दैनंदिनी या दैनंदिनीची एक प्रत प्रत्येक आठवड्याला जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्यास सादर करावी लागेल. कामकाज दैनंदिनी गोपनीय अभिलेख असल्याचे मानण्यात येईल आणि ती काळजीपूर्वक जतन केली जाईल. हे कामकाज दैनंदिनी गहाळ झाल्यास किंवा हरविल्यास परिवीक्षा अधिकारी तात्काळ त्या बाबतची माहिती मुख्या परिवीक्षा अधीक्षकास देईल;

(ख) न्यायालयांमध्ये सादर करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशांच्या सर्व अहवालांच्या प्रती असलेली फाईल/नस्ती :

(ग) चौकशा करण्यासाठी न्यायालयाने परिवीक्षा अधिकाऱ्यास दिलेले सर्व आदेश मिळाल्याचे व ते निकालात काढल्याचे दर्शविणारी नोंदवही;

(घ) पुढील गोष्टीचा समावेश असलेली नमुना आठमध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे असलेली परिवीक्षा अधिकाऱ्याच्या प्रकरणांची फाईल.

(एक) परिवीक्षाधिन अपराधी व्यक्ती व तिच्या प्रकरणाची मुख्य माहिती दर्शविणारे सुरुवातीचे मुखपृष्ठ :

(दोन) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचे पूर्वचरित्र, चारित्र्य किंवा स्वभाव तिच्या कुटुंबातील व सभोवतालची परिस्थिती आणि तिचे अपराधाला कारणीभूत झालेली परिस्थिती. तिच्यावर देखरेख ठेवल्यानंतर तिच्यात झालेली सुधारणा आणि परिवीक्षा कालावधी दरम्यान घडलेल्या अन्य सर्व प्रमुख घटना यांचा घेण्यात आलेला संक्षिप्त आढावाः आणि

(तीन) शिक्षापूर्व अहवालाच्या प्रती, न्यायालयाचे आदेश, बंधपत्रे किंवा वचनपत्रे आणि तिच्या पूर्वेतिहासासह तिच्या संदर्भातील अन्य सर्व नोंदीः

(ङ) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचे (नमुना नऊ मधील) निर्देशपत्रक व कालक्रमानुसार नोंदवही ;

(च) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीसाठी करण्यात आलेली प्रदाने दर्शविणारी नोंदवही त्यात पुढील बाबी दर्शविण्यात येतील.-

(एक) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीच्या देखभालीसाठी नियम ३३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या संस्थेला किंवा जागांना प्रदान करण्यात आलेली रक्कम ;

(दोन) अशा संस्थेमध्ये किंवा जागेत नेणे व परत आणणे यांसाठी होणाऱ्या प्रवास खर्चाकरिता परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीला प्रदान करण्यात आलेली रक्कम ;

(तीन) परिवीक्षा अधिकाऱ्यासमोर उपस्थित होण्यासाठी होणारा खर्च ;

(चार) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीस देण्यात आलेले इतर आर्थिक सहाय्य.

(छ) मुख्य परिवीक्षा अधीक्षक किंवा संचालक वेळोवेळी विहित करील असे इतर अभिलेख.

(२) अंशकालिक परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या बाबतील, पोट-कलम (१) च्या खंड (ख), (ग), (ङ) व (च) मध्ये नमूद करण्यात आलेले अभिलेख जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याच्या कार्यालयात ठेवण्यात येतील.

(३) विशेष परिवीक्षा अधिकारी, पोट-नियम (१) चे खंड (क) व (घ) मध्ये नमूद करण्यात आलेले अभिलेख ठेवील आणि राज्य शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर माहिती जिल्हा परिवीक्षा अधिकारी, मुख्य परिवीक्षा अधीक्षक आणि संचालक यांना पाठवील.

३७. अभिलेख जतन करणे- (१) परिवीक्षा अधिकाऱ्याकडे असलेली प्रत्येक परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीची प्रकरण फाईल ज्या पर्यवेक्षन आदेशाशी ती संबंधित असेल त्या आदेशाच्या समाप्तीच्या दिनांकापासून किमान दहा वर्षांच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल.

(२) प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी दैनंदिनी बंद करण्यात येईल आणि त्यानंतर तो गोपनीय अभिलेख म्हणून मुख्य परिवीक्षा अधीक्षकाच्या कार्यालयात ठेवण्यात येईल. दैनंदिनीचा प्रत्येक खंड/भाग ती बंद केल्याच्या दिनांकापासून किमान दहा वर्षाच्या कालावधीसाठी जतन करून ठेवण्यात येईल. (३) निर्देशपत्र व कालक्रमानुसारी नोंदवही, ती ज्या पूर्ववृत पत्रकाशी संबंधित असेल ते पूर्ववृत्तपत्रक काढून टाकण्यात आल्यानंतर पुढे किमान दहा वर्षे तरी जतन करून ठेवण्यात येईल.

३८. निरीक्षण पुस्तक- प्रत्येक परिवीक्षा अधिकाऱ्याच्या कार्यालयात निरीक्षण पुस्तक ठेवण्यात येईलः आणि अंशकालिक परिवीक्षा अधिकाऱ्याच्या संबंधातील निरीक्षण पुस्तकाची प्रत जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याच्या कार्यालयात ठेवण्यात येईल. संचालक, मुख्य परिवीक्षा अधीक्षक, जिल्हादंडाधिकारी, जिल्हा परिवीक्षा अधिकारी आणि परिवीक्षा अधिकाऱ्याच्या कामाचे निरीक्षण करण्यासाठी संचालक नियुक्त करू शकेल अशा इतर व्यक्ती, त्यांचे निष्कर्ष पुस्तकात नमूद करतील. त्यात नमूद केलेले निष्कर्ष, जिल्ह्याच्या जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याच्या त्यावरील भाष्यासह मुख्य परिवीक्षा अधीक्षकाकडे पाठविण्यात येतील.

३९. जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्यांनी ठेवावयाचे अभिलेख- जिल्हा परिवीक्षा अधिकारी, संचालक विहित करील अशा रीतीने त्याच्या कार्यालयात पुढील अभिलेख ठेवील-

(१) जिल्ह्यातील किंवां त्याच्या अधिकारक्षेत्रातील परिवीक्षा अधिकाऱ्यांची सूची;

(२) नियम ३३ मध्ये निर्दिष्ट केलेली, त्या क्षेत्रातील परिवीक्षागृहे, संस्था किंवा जागा यांची सूची :

(३) जिल्ह्यात देखरेखीखाली ठेवण्यात आलेल्या प्रत्येक परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचे पूर्वचरित्र, त्यात तिच्या प्रकरणाचा संक्षिप्त आढावा आणि परिवीक्षा अधिकाऱ्याकडे असलेल्या प्रकरणाच्या अभिलेखातील महत्त्वाच्या कागदपत्रांच्या दुसऱ्या प्रतीचा समावेश असेलः

(४) परिवीक्षा अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली. (नमुना दोन मधील) जिल्ह्यातील परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींची नोंदवही;

(५) परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या कार्यालयाच्या तपासणी वरील टीपा असलेली, तपासणीची फाईल आणि मुख्य परिवीक्षा अधीक्षकाकडे सादर करण्यात आलेल्या तपासणी अहवालाच्या प्रती,

(६) जिल्ह्यामधील, नियम ३३ मध्ये निर्देशित केलेल्या परिवीक्षागृहांमध्ये, संस्थेमध्ये किंवा जागेमध्ये राहणाऱ्या परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींची नोंदवही,

(७) जिल्हांमधील परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींना प्रदान केलेल्या रकमांची नोंदवहीः

(८) जिल्ह्यांमधील (परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींना ठेवावयाच्या) संस्थांना प्रदान केलेल्या रकमांची नोंदवही,

(९) संचालकाने ठेवावयाचे निर्देश दिले असतील असे इतर अभिलेख.

४०. परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीस परिवीक्षा अधिकाऱ्याच्या खाजगी कामांवर लावता कामा नये-परिवीक्षा अधिकाऱ्यास त्याच्या देखरेखीखाली ठेवण्याकरिता सोपविण्यात आलेल्या कोणत्याही अपराधी व्यक्तीस त्याच्या स्वतःच्या खाजगी कारणांसाठी कामावर लावता येणार नाही किंवा त्याच्याकडून कोणतेही खाजगी काम करून घेता येणार नाही.

४१. आकडेवारी सादर करणे.- प्रत्येक परिवीक्षा अधिकारी मागील अर्ध्या वर्षासाठीची पुढील गोष्टीची आकडेवारी संबंधित जिल्हा परिवीक्षा अधिकाऱ्याकडे सादर व आणि ती मुख्य परिवीक्षा अधीक्षकाकडे सादर करील

(१) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींची संख्या:

(२) परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तींचा कामधंदा :

(३) अधिनियमाच्या कलम ८ खालील, आदेशांमध्ये बदल केल्याची व बंधपत्राच्या शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याची, अधिनियमाच्या कलम ९ अन्वये हाताळण्यात येणारी एकूण प्रकरणे :

(४) त्याच्या अधिकार क्षेत्रातील,

(क) अधिनियमाच्या कलम ३ अन्वये समज देऊन सोडण्यात आलेल्या,

(ख) देखरेखीखाली न ठेवता, अधिनियमाच्या कलम ४ पोट-कलम (१) अन्वये मुक्त करण्यात आलेल्या,

(ग) वय वर्ष २१ च्या आतील असतानाही कारावासाची शिक्षा झालेल्या,

(घ) किशोर सुधारालयाच्या हवाली करण्यात आलेल्या अपराधींची संख्या,

(ङ) "अयशस्वी" म्हणून बंद करण्यात आलेली प्रकरणांची संख्या,

(च) " अयशस्वी " म्हणून बंद करण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या,

(छ) "अन्यथा" म्हणून बंद करण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या.

वर नमूद केलेल्या बाबींची आकडेवारी ही, लिंग, वय (२१ वर्षावरील, १६ ते २१ वर्षे या वयांमधील १६ वर्षांखालील): अपराधीव्यक्तीचा स्वभाव (त्याने प्रथमच अपराध केला आहे, दुसऱ्यांदा अपराध केला आहे. सराईत अपराधी आहे) व गुन्ह्याचे गांभीर्य यांनुसार स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावी :

परंतु अंशकालीन परिवीक्षा अधिकाऱ्यांच्या बाबतीत, या नियमामध्ये नमूद केलेली आकडेवारी ही, जिल्हा परिवीक्षा अधिकारी जमा करील व ठेवील.

(मुखपृष्ठ)

नमुना एक

[नियम १५ (२) (क) पहा)

मुद्रा

महाराष्ट्र शासन

समाज कल्याण विभाग

(लमपृष्ठ)

ओळखपत्र

महाराष्ट्र अपराधी परिवीक्षा नियम, १९६६

नियम १५ (२) (क)

सूचना

१. हे ओळखपत्र जिल्हा परिवीक्षा अधिकारी/पगारदार परिवीक्षा अधिकारी/अंशकालीक परिवीक्षा अधिकारी/विशेष परिवीक्षा अधिकारी म्हणून धारकाची ओळख पटवण्यासाठी आहे.

२. धारक हे ओळखपत्र स्वतःच्या ताब्यात ठेवील आणि ते सुरक्षितपणे ठेवण्यासाठी तो जबाबदार असेल. हे ओळखपत्र गहाळ झाल्यास किंवा त्यानंतर ते सापडल्यास त्याबाबत तात्काळ कार्यालय प्रमुखास कळवावे.

३. धारक व्यक्तीस निलंबित केले असल्यास किंवा तो त्या पदावर न राहिल्यास हे ओळखपत्र संचालक, समाजकल्याण यांना परत करावे.

४. कोणत्याही कारणान्वये ओळखपत्राचा गैरवापर करण्यात आल्यास ओळखपत्र धारक शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल.

आतील बाजू

अनुक्रमांक ----------------------------------------------------

संपूर्ण नाव (ठळक अक्षरात).-----------------------------------------

धारण केलेले पदनाम (ठळक अक्षारात).------------------------------

मुख्यालय----------------------------------------------------------- धारकाचे छायाचित्र

धारकाटी पूर्ण स्वाक्षरी----------------------------------------------

दिनांक------ ---------------------------------------------------

(सही)--------------------------------------------------------

मुख्य परिवीक्षा अधीक्षक-----------------------------------------

दिनांक--------------------------------------------------------

ठिकाण--------------------------------------------------------

नमुना दोन

[नियम १६ (३) (क), २० (२)]

परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीतील सुधारणेचा मासिक अहवाल

भाग एक

| | |
|---|---|
| परिवीक्षा कार्यालय------------------------------------ | ------------------- या महिन्याकरिता |
| नोंदणी क्र.-------------------------------------------- | न्यायालय---------------------------- |
| परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचे नाव---------------------- | रोख क्र.------------------------------ |
| ------------------------------------------------------ | दिनांक------------------------------ |
| परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचा पत्ता--------------------- | पर्यवेक्षण आदेश---------------------- |
| ---------------------------------------------------- | परिवीक्षाकालावधी-------------------- |

भाग दोन

| मुलाखतीचे ठिकाण | दिनांक |
|---|---|
| ------------------------------------------ | ------------------------------------------------ |
| ------------------------------------------ | ----------------------------------------------- |
| ------------------------------------------- | ----------------------------------------------- |

१. परिवीक्षाधीन अपराधी व्यक्ती कोठे राहते ?

२. कोणत्याही शैक्षणिक प्रशिक्षण पाठ्यक्रमात केलेली प्रगती.

३. ती कोणत्या प्रकारचे काम करीत आहे आणि तिची मासिक सरासरी प्राप्ती.

४. डाक कार्यालयात केलेली बचत तिच्या नावाचे बँकेचे बचत खाते.

५. परिवीक्षाधीन अपराधी व्यक्तीचे आरोग्य.

६. तिची सर्वसाधारण वर्तणूक व प्रगती यांबाबतचे शेरे.

भाग तीन

७. न्यायालयासमोर/जिल्हा दंडाधिकाऱ्यासमोर असलेली पुढील गोष्टींबद्दलची कोणतीही कार्यवाही, -

(क) अधिनियमाच्या कलम ८(१) किंवा
९(१) खालील बंधपत्राच्या शर्तीमध्ये
बदल करणे; किंवा

(ख) रहिवासाच्या ठिकाणातील बदल,
नियम पहा; किंवा

(ग) अधिनियमाच्या कलम ८ (३) अन्वये सुटका

(ग) इतर कोणतीही बाब.

८. परिवीक्षा कालावधी पूर्ण केल्याचा दिना

९. परिवीक्षेचा निष्कर्ष, अभिप्रायांसह
(कोणतेही असल्यास)

१०. सुटका झाल्यानंतरचा व्यवसाय व पत्ता:

परिवीक्षा अधिकारी

प्रति,
जिल्हा परिवीक्षा अधिकारी/न्यायालय — अहवालाचा दिनांक

प्रत रवाना,
मुख्य परिवीक्षा अधीक्षक — पत्ता.

नमुना तीन

[नियम १७ (१) पहा]

मुद्रा

प्रारंभिक चौकशीबाबतचा अहवाल

अनुक्रमांक

(अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ अन्वये)

न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात

(ठिकाण) (जिल्हा)

१९........ चे न्यायालयीन प्रकरण क्रमांक------------------ सुनावणीचा दिनांक----------------------

अपराध :

राज्य (पोलीस ठाणे) १९--------- चा अपराध/गुन्हा क्रमांक.

(परिविक्षाधीन) अपराध्याचे
नाव

पत्ता (राहण्याचे ठिकाण)

वय

लिंग व धर्म

वैयक्तिक पूर्ववृत्त

वर्तणूक व सवयी (नैतिक, मनोरंजन विषयक इत्यादी)

स्वभाव (स्वभावधर्म व व्यक्तीमत्वातील विशेष लक्षणे).

शारिरीक व मानसिक आरोग्यासंबंधातील पूर्ववृत्त आणि
सध्याची स्थिती.

फावल्या वेळेतील उपक्रम.

बाह्य प्रभाव

शाळेतील वर्तणूक आणि शिक्षकांचा अहवाल, उपलब्ध
असल्यास नोकरी संबंधातील सेवायोजन संबंधातील
रोजगार संबंधातील पूर्ववृत्त.
सध्याचा व्यवसाय आणि वेतन
(कामाच्या विश्रांती, इत्यादीसंबंधातील शती देखील नमूद कराव्या)
नियोक्त्याचा अहवाल, कोणताही असल्यास
सहयोगी
सामाजिक व धार्मिक संघटनांबरोबरचे संबंध
कोणतंही असल्यास

कोविक स्थिती गृहस्थिती
पुढील व्यक्तींचा कौटुंबिक इतिहास.-

(क) वडील
(ख) आई
(ग) सावत्र पिता/वडील
(घ) सावत्र आई
(ङ) भाऊ
च) र्वाहणी
(छ) पत्नी
(ज) मुले
(झ) इतर हितसंबंधित नातेसंबंध,
कोणतेही असल्यास.

कुटुंबाची आर्थिक स्थिती

कुटुंबाशी हितसंबंध असणारी कोणतीही
सामाजिक अभिकरणे, संस्था किंवा व्यक्ती.

पालकांचा आणि नातेवाईकांचा अहवाल.

परिवीक्षाधीन अपराध्याबाबतचे कुटुंबाचे
धोरण/वागणूक आणि त्याच्यावरील /
तिच्यावरील त्याबाबतच्या प्रभावाची व्याप्ती.

शेजाऱ्यांचे प्रतिवृत्त घराच्या आजूबाजूचे
वातावरण आणि सर्वसाधारण रागरंग.

गरिबी किंवा असुरक्षित जीवन हे अपराधाचे
कारण आहे काय ?

कायदेविषयक वृत्त

पूर्वी कधी संस्थेत राहिल्याची नोंद आहे काय ?

सध्याच्या अपराधाची माहितो आणि ज्या परिस्थितीत
तो अपराध घडला ती परिस्थिती.

परिवीक्षाधीन अपराध्याची अपराधाबद्दलची स्वतःची
प्रतिक्रिया आणि संभाव्य शिक्षेबद्दलची मानसिकता.

न्यायालयाने मागितलेली कोणताही विशेष माहिती.

सारांश

(क) अपराधी आणि त्याचे आजूबाजूचे वातावरण
आणि अपराध यांसंबंधातील वास्तविक पार्श्वभूमी.

(ख) लक्षणे (अपराध्याची वृत्ती, स्वभावातील किंवा
कुटुंबातील दोष, अपराधावद्दलच्या प्रेरणा आणि
तत्कालिक (प्रासंगिक) कारणांसारखी इतर
संबंधित कारणे).

(ग)निदान/अनुमान (सर्वाधिक योग्य वाटलेली
उपचारप्रक्रिया आणि सुधारणा होण्याची शक्यता)

(घ) शिफारस (न्यायालयाने मागितली असल्यास)
परिवीक्षा अधिकाऱ्याचे नाव व पत्ता :

राज्य---------------------------------- जिल्हा मुख्यालय-----------------------------------------

दिनांक----------------------

प्रकरणाच्या निकालाचे स्वरूप

निकालात काढण्याचा दिनांक

परिवीक्षा अधिकारी

नमुना चार

[नियम २७ (१) पहा]

मुद्रा

आदेश

अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ याच्या कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये.

परिवीक्षा अधिकारी,---------------------------------------------------------------

ज्याअर्थी, प्रकरण क्रमांक------------------------मध्ये, कलम--------------------------------अन्वये न्यायालयासमोर हजर करण्यात आलेले (नाव)-----------------------------------------------(वडिलांचे नाव)------------------------------------------------ (पूर्ण पत्ता) ---------------------------------------------------------------------------------याच्या/हिच्या प्रकरणाच्या संबंधात अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा अधि. २०) याच्या कलम ४ च्या पोट-कलम (२) खालील, किंवा------------------------------ च्या तरतुदींखालील अहवाल आवश्यक आहे. म्हणून आपणास याद्वारे, चौकशी करून आवश्यक ती माहिती गोळा करण्याचा किंवा ती गोळा करण्यासाठी व्यवस्था करण्याचा आणि ती, दिनांक---------------------------- रोजी या न्यायालयासमोर मांडण्याचा निदेश देण्यात येत आहे.

न्यायालयाची मोहर

सत्र न्यायालय दंडाधिकारी.

नमुना पाच

[नियम २८ (क) पहा)]

मुद्रा

शांतता राखण्यासंबंधात व चांगली वर्तणूक ठेवण्यासंबंधात बंधपत्र

अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ याच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये.

----------------------------------दंडाधिकारी यांचे न्यायालय.

१९---------------------- चे प्रकरण क्रमांक ----------------------------------

ज्याअर्थी, मी ---------------------------------------राहणार------------------------------ --------------------------------------------------------------------- या कालावधीत

बोलाविण्यात येईल तेव्हा हजर होण्याबाबत आणि शिक्षा स्वीकारण्याबाबत एक बंधपत्र करून देण्याच्या अटीवर,-------------------------------- न्यायालयाने माझ्या सुटकेचे आदेश दिलेले आहेत.

मी, याद्वारे पुढील गोष्टी करण्यासाठी बांधील आहे-

(१) बोलावण्यात येईल तेव्हा हजर होणे आणि शिक्षा स्वीकारणे;

(२) शांततेचा भंग न करणे किंवा ज्यामुळे शांततेचा भंग होईल असे कोणतेही कृत्य न करणे; आणि

(३) उक्त कालावधीत शासनाबरोबर आणि भारताच्या सर्व नागरिकांबरोबर चांगले वर्तन ठेवणे आणि चांगल्या वर्तणुकीसाठीच्या ह्या बंधपत्राच्या कालावधीत परिवीक्षा अधिकाऱ्याच्या अनुदेशांचे अनुपालन करणे, असे करण्यात माझ्याकडून कसूर झाल्यास, मी याद्वारे रुपये ------------------------------------- एवढी रक्कम शासनाकडे दंड म्हणून जमा करण्यास बांधील आहे.

दिनांक------------------- माहे----------------------- १९-----------

सही

माझ्यासमोर निष्पादित करून दिले.

दंडाधिकारी

मी/आम्ही याद्वारे, उपरिनामित-------------------------------------------------------------------हो,

(१) शिक्षा स्वीकारण्यासाठी बोलाविण्यात येईल तेव्हा हजर होईल आणि शिक्षा स्वीकारील;

(२) शांततेचा भंग करणार नाही किंवा ज्यामुळे शांततेचा भंग होईल असे कोणतेही कृत्य करणार नाही; आणि

(३) उक्त कालावधीत शासनाशी आणि भारतातील सर्व नागरिकांशी तिचे वर्तन चांगले असेल;

याकरिता स्वतःला जामीनदार घोषित करीत आहोत.

यात तिच्याकडून कसूर झाल्यास, मी/आम्ही संयुक्तपणे आणि पृथकपणे रुपये ------------------------ एवढी रक्कम शासनाकडे दंड म्हणून जमा करण्यासाठी बांधील आहोत.

दिनांक--------------------- माहे------------------ १९-------------

सही

(सही)

माझ्यासमोर निष्पादित करून दिले.

दंडाधिकारी.

नमुना सहा

[नियम २८ (ख) पहा]

मुद्रा

पर्यवेक्षण आदेश

अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ याच्या कलम ४ च्या पोट-कलम (३) अन्वये.

---------------------दंडाधिकारी यांच्या न्यायालयात

१९ ---------------चे प्रकरण क्रमांक---------------

ज्याअथी,------------------------------------ कलम--------------------------------खालील अपराधाबद्दल दोषी असल्याचे आज रोजी आढळून आले आहे;

आणि उक्त व्यक्तीस पर्यवेक्षणाखाली ठेवणारा आदेश देऊन तिच्यावर कार्यवाही करणे इष्ट असल्याबद्दल न्यायालयाची खात्री पटली आहे;

त्याअथी, याद्वारे आदेश देण्यात येतो की, पुढील शर्तींना अधीन राहून उक्त व्यक्तीस, कालावधीकरिता---------------------------परिवीक्षा अधिकारी, याच्या पर्यवेक्षणाखाली ठेवण्यात यावे

(१) तो, या आदेशाच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत, यात नाव दिलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्यासमोर स्वतः हजर होईल, आणि त्या आदेशाच्या आणि तिने निष्पादित केलेल्या बंधपत्राच्या प्रती सादर करील;

(२) ती, परिवीक्षा अधिकाऱ्याच्या किंवा त्याच्या जागी नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली स्वतःला स्वाधीन करील.

(३) ती, (क) यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत स्वतःच्या वास्तव्याच्या ठिकाणाबाबत आणि उपजिविकेच्या साधनाबाबत परिवीक्षा अधिकाऱ्याला अवगत करील, (ख)--------------------------------------------- कालावधीकरिता------------------------------------------------ येथे वास्तव्यास राहील;

(४) ती, सक्षम प्राधिकाऱ्याची, म्हणजे, -------------------------------याची लेखी परवानगी असल्याशिवाय जिल्हा किंवा---------------------------------------चे अधिकारक्षेत्र सोडून जाणार नाही.

(५) ती, दुर्जनांच्या संगतीत राहणार नाही किंवा दुर्व्यसनी/दुराचारी जीवन जगणार नाही

६) ती, प्रामाणिकपणे आणि शांततापूर्व जीवन जगेल आणि प्रामाणिकपणे अर्थार्जन करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहील :

(७) ती, भारतात अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यासमोर शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध करणार नाही;

(८) ती, मादकद्रव्ये घेण्यापासून स्वतःला दूर ठेवील;

(९) ती, वर नमूद केलेल्या शर्तींचे यथोचित अनुपालन करण्यासाठी परिवीक्षा अधिकाऱ्याकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा निदेशांचे पालन करील.

दिनांक---------------------- माहे -------------------१९--------------

न्यायाधीश किंवा दंडाधिकारी.

नमुना सात

[नियम २८ (ग) पहा]

मुद्रा

परिवीक्षाधीन अपराध्याचे वचनपत्र

अपराधी परिवीक्षाधीन अधिनियम, १९५८ याच्या कलम ४ च्या पोट-कलम (४) अन्वये.

----------------------दंडाधिकारी यांच्या न्यायालयात

१९ ---------------------चे प्रकरण क्रमांक----------------

ज्याअर्थी, मी,---------------------------------- राहणार--------------------------------------- न्यायालयाने दिलेल्या पर्यवेक्षण आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या शतीचे पालन करण्याबाबत बंधपत्र करून द्यावे. या अटीवर -------------------------------------------न्यायालयाने माझ्या सुटकेचे आदेश दिलेले आहेत. म्हणून, या मी याद्वारे पुढील गोष्टी करण्यासाठी बांधील आहे:-

(१) न्यायालयाने अशा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती मला मान्य असतील व त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत मी त्यांची पूर्तता करीन.

(२) मी, पर्यवेक्षण आदेशाच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत, आदेशात नामनिर्दिष्ट केलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्यासमोर स्वतः हजर होईन आणि आदेशाच्या, आणि मी निष्पादित केलेल्या बंधपत्राच्या प्रती सादर करीन.

(३) मी. पर्यवेक्षण आदेशात नामनिर्दिष्ट केलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याच्या किंवा त्याच्या जागी नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली स्वतःला स्वाधीन करीन.

(४) मी, (क) आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत माझ्या वास्तव्याच्या ठिकाणाबाबत आणि उपजिविकेच्या साधनाबाबत परिवीक्षा अधीकाऱ्याला अवगत करीन (ख)---------------------------------------------- ---------------------------------- कालावधीत----------------------------- येथे वास्तव्यास राहीन

(५) मी, सक्षम प्राधिकाऱ्याची म्हणजेच, --------------------------------------------- ची लेखी परवानगी असल्याशिवाय उक्त जिल्हा किंवा---------------------------- चे अधिकार क्षेत्र सोडणार नाही.

(६) मी, दुर्जनांच्या संगतीत/सहवासात राहणार नाही किंवा दुर्व्यसनी जीवन जगणार नाही.

(७) मी, प्रामाणीक आणि शांततेचे जीवन जगेन, आणि प्रामाणिकपणे अर्थार्जन करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहीन.

(८) मी, भारतात अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे शिक्षापात्र असलेल्या कोणताही अपराध करणार नाही.

(९) मी, मादकद्रव्ये घेण्यापासून स्वतःला दूर ठेवीन.

(१०) मी, माझा भावी काळ सुधारण्यासाठी रुग्णालय, मनोचिकित्सालय आणि व्यवसायोपचार केंद्र इत्यादीमध्ये जाऊन उपचार घेण्याच्या संबंधात आणि तसेच वर नमूद केलेल्या शर्तीचे योग्य पालन करण्यासंबंधात परिवीक्षा अधिकाऱ्याकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा निदेशांचे पालन करीन.

यात माझ्याकडून कोणतीही कसूर झाल्यास, मी याद्वारे, रुपये ----------------- एवढी रक्कम शासनाकडे दंड म्हणून जमा करण्यास बांधील आहे.

दिनांक----------------------- माहे --------------१९-----------

सही

माझ्यासमोर निष्पादित करून दिले.
दंडाधिकारी.

मी/आम्ही याद्वारे उपरिनामित-------------------------------------- करिता स्वतःला जामीनदार घोषित करतो की, ती पर्यवेक्षण आदेशात व बंधपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींचे पालन करील आणि त्यात तिच्याकडून कोणताही कसूर झाल्यास मी/आम्ही याद्वारे, संयुक्तपणे आणि पृथकपणे रुपये------------------ एवढी रक्कम शासनाकडे दंड म्हणून जमा करण्यासाठी याद्वारे, बांधील आहे/आहेत.

सही

माझ्यासमोर निष्पादित करून दिले.
दंडाधिकाऱ्याची सही.

मी/आम्ही याद्वारे उपरिनामित -------------------------------------------करिता स्वतःला जामीनदार घोषित करतो की, ती पर्यवेक्षण आदेशात व बंधपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींचे पालन करील आणि त्यात तिच्याकडून कोणतीही कसबर झाल्यास, मी/आम्ही याद्वारे, संयुक्तपणे आणि पृथकपणे रुपये------------------ एवढी रक्कम शासनाकडे दंड म्हणून जमा करण्यासाठी याद्वारे बांधील आहे/आहेत.

सही

माझ्यासमोर निष्पादित करून दिले.
दंडाधिकारी.

नमुना आठ

[नियम ३६ (१) (घ) पहा

मुद्रा

परिवीक्षाधीन अपराध्याच्या प्रकरणाची फाईल

क. (मुखपृष्ठ)

परिवीक्षा कार्यालय--------------------------------- न्यायालय----------------------------------------

कार्यालय नोंदणी क्रमांक-------------------------- प्रकरण कमांक-------------------------------------

परिवीक्षाधीन अपराध्याचे नाव---------------------------------- पर्यवेक्षण आदेशाचा दिनांक--------------

------------------------------------------ अपराध (कलम):-------------------------------------

पत्ता:-------------------------------------------------------

व्यवसाय:---------------------------------------------------

मूळ पत्ता :-------------------------------------------------

मातृभाषा :------------------

लिंग---------- वय---------------

अटक केल्याचा दिनांक, वेळ व ठिकाण :

प्रकरणाची वस्तुस्थिती (संक्षिप्त):

पूर्वीची अपराधसिद्धी :

चौकशीसाठी पाठविल्याचा दिनांक :

चौकशी करणाऱ्याचे नाव :

चौकशी अहवाल सादर केल्याचा दिनांक:

मासिक प्रगती अहवाल सादर केल्याचा दिनांक :

अंतिम निकाल------------------ } पहिले वर्ष, दुसरे वर्ष, तिसरे वर्ष

व तारीख----------------------- } पहिले वर्ष, दुसरे वर्ष, तिसरे वर्ष

"ब" संक्षिप्त

१. संक्षिप्त कौटुंबिक इतिहास व
घरगुती वातावरण घरची परिस्थिती:

२. शालेय वर्तणूक व नोकरीतील कारकीर्द:

३. गुन्हे दुष्कृत्ये:

४. आरोग्य:

५. मानसिक स्थिती:

६. आजूबाजूचे वातावरण/परिस्थिती :

७. इतर कोणतेही ठळक वैशिष्ट
आणि अतिरिक्त माहिती:

८ कालक्रमानुसार प्रकरणाची प्रगती :

९. परिवीक्षा अधिकाऱ्याने केलेल्या सूचना

१०. न्यायालयाचा अंतिम आदेश (दिनांकासह) :

११. पर्यवेक्षणाखाली/पर्यवेक्षणाधीन असताना
जामीन राहिलेल्या व्यक्तीचे / व्यक्तीचे नाव
व पत्ता :

१२. (क) कोणतेही क्षेत्र/परिवीक्षा वसतिगृह
किंवा अन्य ठिकाण यातील वास्तव्यबाबतचे
निबंध. :

(ख) इतर निबंध:

१३. प्रगती अहवालातील ठळक मुद्दे:

१४. अधिनियमाच्या कलम ८ आणि ९ अन्वये, :
आदेशातील सुधारणा, कोणत्याही
असल्यास.
१५. अंतिम निकाल

परिवीक्षा अधिकारी

"क" इतर घटनांचा आशय

१. शिक्षापूर्व अहवाल :

२. न्यायालयाचा आदेश :

3. निष्पादित केलेल्या बंधपत्राची / वचनपत्राची :
प्रत, असल्यास.

४. पत्रव्यवहार :

५. मासिक अहवाल

नमुना

- [नियम ३६ (१) (ङ) पहा]

परिवीक्षाधीन अपराध्यांची कालक्रमानुसार नोंदवही

| अनुक्रमांक | परिवीक्षाधीन अपराध्याचे नाव, वडिलांचे नाव व पत्ता | लिंग, वय धर्म, ओळख चिन्हे, इत्यादी | अपराध ( अपराधाचे कलम व त्याचे संक्षिप्त वर्णन द्यावे | पर्यवेक्षण आदेश देण्याऱ्या न्यायालयाचे नाव व प्रकरण क्रमाक | पर्यवेक्षण आदेशाचा दिनांक व पर्यवेक्षणाचा कालावधी | परिविक्षा अधिकाऱ्याचे नाव | शिक्षापूर्व अहवाल सादर केला आहे किंवा नाही ? (सादर केला असल्यास शिक्षापूर्व अहवालाचा क्रमांक व तारीख घ्यावी.) | परिवीक्षाधीन अपराधी परिवीक्षा वसतीगृहात राहतो काय? असल्यास, त्या वसतिगृहाचे नाव व पत्ता घ्यावा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

| जमीदाराचे नाव व पत्ता कोणतेही असल्यास. | व्यवसाय कोणताही असल्यास आणि नियोक्ताचे नाव व पत्ता असल्यास | मूळ पर्यवेक्षण आदेशातील कोणतेही फेरबदल व अशा फेरबदलाची तारीख | दिलेल्या भेटींची संख्या | घेतलेल्या भेटींची संख्या | सादर केलेल्या (प्रगती) अहवालांची संख्या | पर्यवेक्षणाचा निष्कर्ष आणि परिवीक्षा अधिकाऱ्याचे अभिप्राय कोणतेही असल्यास | परिवीक्षा कालावधी पूर्ण केल्यानंतरचे वृत्त | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | पहिले वर्ष (क) | दुसरे वर्ष (ख) | तिसरे वर्ष (ग) | चौथे वर्ष (घ) | पाचवे वर्ष (ङ) |
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | | | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नव्याने

बी. बी. पोमास्टर,

शासनाचे सचिव.